महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## विभाजन विभीषिका स्मृती दिवस प्रदर्शनीचे स्वतंत्रता सेनानी द्वारे उदघाटन

## मेट्रो स्थानकावर स्वतंत्रता सेनानींचा सत्कार समारोह





नागपुर: संस्कृती मंत्रालय, भारत सरकार द्वारे आयोजित विभाजन विभीषिका स्मृती दिवस प्रदर्शनीचे सिताबर्डी इंटरचेंज येथे महा मेट्रो द्वारे आयोजन करण्यात आले असून स्वतंत्रता सेनानी श्री. शेषराव मुरकुटे व श्री. बसंतकुमार चौरसिया यांच्या हस्ते सदर प्रदर्शनीचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी देशाच्या स्वतंत्रता लढाई व १४ ऑगस्ट रोजी देशाचे झालेले विभाजन या स्मृतीं ताज्या झाल्या स्वतंत्रता सेनानी यांनी अनेक प्रसंगाच्या आठवणी यावेळी नमूद केल्या.

उल्लेखनीय आहे कि, मागील वर्षी देखील महा मेट्रोच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ज्याला मोठ्या संख्येत नागरिकांचा प्रतिसाद मिळाला होता सदर प्रदर्शनी आज पासून नागरिकाकरिता सुरु झाली आहे.

नागपूरच्या बदलत्या स्वरूपाची माहिती स्वतंत्रता सेनानी यांनी नमूद केली. नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. स्वतंत्रता पासून ते आज मेट्रो शहरच्या दिशेने नागपूरची वाटचाल झाली आहे हे आश्चर्य चकित करणारे असल्याचे श्री. शेषराव मुरकुटे यांनी सांगितले तसेच देशाकरता आताही कार्य करण्याकरिता मी तयार आहे असे त्यांनी यावेळी नमूद केले. श्री. बसंतकुमार चौरसिया यांनी सांगितले कि स्वतंत्रता लढाई मध्ये आम्ही मिळून कार्य केले त्यामधील काही लोक आताही संपर्कात आहे.

या कार्यक्रम प्रसंगी महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हार्डीकर यांनी स्वतंत्रता सेनानी यांना महा मेट्रोच्या वतीने स्मृतिचिन्ह भेट दिली. यावेळी महा मेट्रोच्या वतीने संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री.अनिल कोकाटे, संचालक(प्रकल्प) श्री. राजीव त्यागी, कार्यकारी संचालक (ऑपरेशन अण्ड मेंटेनस ) श्री. उदय बोरवणकर आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.